# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

### प्रसिद्ध पत्रक

- **02 ऑक्टोंबर 2025. रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त मिरा भाईंदर महानगरपालिकातर्फे शहरात महास्वच्छता अभियानाचे आयोजन**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त दि. 20 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर 2025 या कालावधीत "स्वच्छता ही सेवा" पंधरवडा मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. या निमित्ताने मिरा भाईंदर महानगरपालिका मा.आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ.शर्मा [भा.प्र.से] यांच्या मार्गदर्शनाखाली मिरा भाईंदर शहरातील सर्व घटकांच्या सहभागाने सगळ्या प्रभाग / वार्ड मध्ये महास्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर अभियानात सकाळी 08.00 वाजल्यापासून सर्व महानगरपालिका अधिकारी व सफाई कर्मचारी यांनी प्रभागातील अधिनिस्त सर्व लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, शहरातील नागरीक असे एकूण मिळून १५०० जणांनी धार्मिक स्थळे, चौपाटी, वास्तु, पुतळे, स्मारके, मार्केट, रेल्वेस्टेशन, बस स्थानके परिसर, मनपा. उद्याने, तलाव व स्वच्छतागृहांची साफसफाई करून महास्वच्छता अभियान यशस्वी केले. भाईंदर शहरातील मनमंदिर,बालाजी हॉटेल तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालय येथे विशेष महास्वछता अभियान राबविण्यात आले. त्यानंतर सकाळी 10.00 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान स्वर्गीय लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अपर्ण करून अभिवादन करण्यात आले.

महास्वच्छता अभियानाच्या निमित्ताने मिरा भाईंदर शहर स्वच्छ होऊन स्वच्छतेबाबत शहरात जागरूकता, उस्फुर्त जनसहभाग देखील पाहायला मिळाला. या अभियानात उपायुक्त [ घनकचरा व्यवस्थापन विभाग ] डॉ. सचिन बांगर, उपायुक्त [मुख्यालय ] श्रीमती कल्पिता पिंपळे, कार्यकारी अभियंता ( पाणी पुरवठा विभाग) शरद नाणेगावकर, सहाय्यक आयुक्त योगेश गुणीजन ,माहिती व जनसंपर्क अधिकारी राज घरत, अग्निशामक दलाचे अधिकारी व कर्मचारी , उद्यान विभागाचे अधिकारी व कर्मचारी, प्रभाग अधिकारी ,स्वछता निरीक्षक व इतर मनपा अधिकारी तसेच सफाई कर्मचारी उपस्थित होते.